www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-20 ■छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 19 जानेवारी 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4


**त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप - श्री गुरु तेग बहादूर साहिबजी**

सविस्तर वृत्त पान ४ वर

# मते विकली जात आहेत, लोकशाहीचा बाजार भरला आहे

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मते विकली जात आहेत. उघडपणे, निर्लज्जपणे! लोकशाहीच्या मंदिरातच आज दलाल बसले आहेत आणि मतदाराला ग्राहक बनवले गेले आहे. पैशाच्या गठ्ठ्यांवर, दारूच्या बाटल्यांवर, जात-धर्माच्या विषारी गणितावर निवडणुका जिंकल्या जात असतील, तर ती निवडणूक नसून लोकशाहीची थट्टा आहे आणि ती थट्टा रोज चालू आहे.

मत हे पवित्र हक्क आहे, पण सत्तेच्या हव्यासाने त्याची बोली लावली जाते. गरीबांची गरज, बेरोजगारांची हतबलता आणि प्रशासनाची निष्क्रियताङ्घा तिघांच्या संगनमतातून मतखरेदीचा उद्योग फोफावला आहे. काही हजार रुपयांत स्वाभिमान विकला जातो, कारण राज्यकर्त्यांनी स्वाभिमान जगण्यासाठीची साधनेच हिरावून घेतली आहेत. मग दोष कोणाचा? मतदाराचा की त्याला हतबल करणाऱ्या व्यवस्थेचा?

राजकीय पक्षांचा चेहरा पाहिला तर हा किडा आतूनच खाऊन टाकलेला दिसतो. घोषणा म ोठ्या, विचार पोकळ; नैतिकता भाषणापुरती;



आणि सत्ता मिळाली की विस्मरण. उमेदवारांची निवड गुणांवर नाही, तर खर्च करण्याच्या क्षम तेवर होते. काळा पैसा निवडणुकीचा ऑक्सिजन बनला आहे. निवडणूक आयोग निष्पक्षतेच्या घोषणा करतो, पण जमिनीवर पैसा मोकाट सुटलेला असतो. कारवाई उशिरा, शिक्षा नाममात्र आणि गुन्हेगार पुन्हा विजयी!

आज मत विकले गेले, तर उद्या आवाज गहाण पडतो. आज लाच घेतली, तर उद्या लुटीवर बोलण्याचा हक्क संपतो. पाच वर्षे भ्रष्टाचार सहन करून पुन्हा काही नोटांसाठी मत विकणारी लोकशाही स्वतःच्या कबरखणनाला हातभार लावत असतेङ्घे कटू सत्य स्वीकारावेच लागेल.

हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर जाणीवेचा आहे. मतखरेदी करणाऱ्यांवर कठोर शिक्षा, उमेदवारांच्या खर्चावर खऱ्या अर्थाने अंकुश, काळ्या पैशाचा कणा मोडणारी कारवाईङ्घ्या गोष्टी कागदावर नाही, तर प्रत्यक्षात दिसल्या पाहिजेत. आणि मतदारानेही ठाम निर्णय घ्यावा लागेल: तात्पुरत्या फायद्यासाठी भविष्य गहाण ठेवायचे की लोकशाही वाचवायची?

लोकशाही ही भीक नाही, ती विक्रीची वस्तूही नाही. ती रोज जपायची जबाबदारी आहे. मते विकली जात राहिली, तर उद्या सत्ता खरेदी होईलङ्घआणि मग आपण नागरिक राहणार नाही, फक्त ग्राहक उरणार!

छत्रपती संभाजीनगर सार्वत्रिक निवडणुक नुकताच पार पडली. त्यात अनेक ठिकाणी पैसे वाटणारे, याद्यासह पकडले गेले त्यांचे पुढे काय झाले हे जनतेला माहीतीच नाही. परंतु ही घटना निंदनीय आहे. शासनाने कडक पावले उचलून ही प्रथा बंद केली पाहिजे असे सर्व सामान्य मतदारांला, नागरिकाला वाटते परंतु यात सरकारला नाही एवढा रस राहिलेला नाही. शेवटी अन्याय अत्याचार करून जर शासन चालवायचे असेल तर निवडणुकाही का घ्यायचे नाही मतदानही का करायचे? असा प्रश्न येतोच. संभाजीनगरातील संजयनगर प्रभाग २४ मध्ये आधी वंचित बहुजन आघाडीचे पॅनल विजयी झाले. नंतर एका राजकीय नेत्याच्या वरदहस्ताने निकाल पडल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात आला. त्याचा रोष ही दिसला परंतु निगरगठ्ठ प्रशासन, शासन यांना मात्र काहीच फरक पडत नाही. अक्षरश महिला नागरिक रडू लागले. आक्रोश करू लागले. तरी या गेंड्याच्या कातडीच्या लोकांना पाझर फुटला नाही. सत्य काय आहे. किती दिवस हा अन्याय चालत राहील कोण जाने. परंतु २४ प्रभागामध्ये नागरिकांच्या मनातील नगरसेवक म्हणून वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांचा मान राहील. हे मात्र निश्चित.

# निर्यातक्षम राज्यांत महाराष्ट्र आघाडीवर

**नवी दिल्ली**

नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांक - २०२४ मध्ये (ईपीआय) महाराष्ट्राने तामिळनाडूला मागे टाकत पहिले स्थान पटकावले आहे. देशातील पाच राज्यांत गुजरात, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशचा अनुक्रमे तीन, चार आणि पाचवा क्रमांक लागतो.

केंद्र सरकारने बुधवारी जाहीर केलेल्या यादीनुसार, महाराष्ट्राने तामिळनाडूकडून पहिले स्थान संपादन केले आहे. आर्थिक वर्ष २०२२ ते २०२४ या कालावधीत केलेल्या कामगिरीवरून ही यादी तयार करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२२ मध्ये तामिळनाडूचा पहिला क्रमांक होता. खालोखाल म हाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि हरियाणाचा क्रमांक लागत होता. आयोगाने

## नीती आयोगाच्या निर्यात निर्देशांकात तामिळनाडूमागे



दिलेल्या माहितीनुसार, 'ईपीआय २०२४'ची क्रमवारी 'ईपीआय २०२२'शी तुलना करण्यायोग्य नाही. कारण, राज्यांचे मूल्यांकन करण्याची संपूर्ण कार्यपद्धती बदलली आहे. लहान राज्ये, ईशान्येकडील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या क्रम वारीत, उत्तराखंडने अव्वल स्थान पटकावले आहे.

त्यानंतर जम्मू आणि काश्मीर, नागालँड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, गोवा यांचा क्रमांक लागतो.

निर्यात हे विकासाच्या प्रमुख चालकांपैकी एक आहे. भारताला ३० लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था बनण्यासाठी निर्यातीचा वाटा ७.५ लाख कोटी डॉलरवर न्यावा लागेल. त्यात ज्या राज्यांची निर्यात सज्जता आहे.

ज्या राज्यांची तशी क्षमता आहे, त्यांची या यादीत निवड करण्यात आल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली म हाराष्ट्राने राबविलेल्या विविध धोरणांमुळे निर्यातीत पहिला क्रमांक पटकावण्यात राज्य यशस्वी ठरल्याचे नीती आयोगाने म्हटले आहे.

ऑटोमोबाईल्स, अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्माण, रसायने, कापड आणि आयटी सेवा यासारख्या क्षेत्रांत राज्याने धडाकेबाज कामगिरी केली आहे. तसेच, मुंबई आणि जवाहरलाल नेहरू बंदर यासारख्या प्रमुख बंदरांच्या उपस्थितीने निर्यात वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

निर्यातदारांसाठी एकल-खिडकी प्रणाली, लॉजिस्टिक्स सुधारणा, औद्योगिक क्लस्टर्सचा विकास आणि जिल्हा-विशिष्ट उत्पादन ओळख, यासारख्या उपक्रमांमुळे राज्याची निर्यात तयारी बळकट झाल्याचे नीती आयोगाने म्हटले आहे.

# नावातील विसंगतीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षेच्या नोंदणी प्रक्रियेत 'आधार' आणि 'अपार' आयडी सक्तीचा केल्याने विद्यार्थ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. आधार कार्ड आणि दहावी-बारावीच्या गुणपत्रिकेतील नावांमध्ये असलेल्या तफावतीमुळे नाव नोंदणीत तांत्रिक अडचणी येत असून विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने यंदापासून आधार पडताळणी अनिवार्य केली आहे. गुणपत्रिकेवरील नाव आणि आधारवरील नाव (स्पेलिंगसह) तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. नावाच्या स्पेलिंगमध्ये किरकोळ फरक, आडनाव किंवा मधल्या नावातील विसंगती आढळल्यास अर्ज नाकारले जाण्याचे संकेत देण्यात आले आहेत. यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संधीला मुकावे लागण्याची भीती व्यक्त होत आहे.

अनेक विद्यार्थ्यांच्या नावातील चुका या प्रशासकीय किंवा तांत्रिक त्रुटींमुळे झाल्या आहेत. आधार कार्ड दुरुस्त करण्यासाठी जन्म दाखल्याची आवश्यकता असते, मात्र ही प्रक्रिया अत्यंत संथ असल्याने नोंदणीच्या अंतिम मुदतीपूर्वी दुरुस्ती करणे अशक्य झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने त्यांना याचा मोठा फटका बसत आहे.

अंतिम टप्प्यावर कागदपत्र पडताळणी केली जाते. मात्र सीईटी कक्षाने या नियमाबाबत अद्यापही भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त आहे. सीईटी कक्षाने तातडीने धोरणात्मक स्पष्टता करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, किंवा स्वतंत्र दुरुस्ती कालावधी उपलब्ध करून दिल्यास अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकतो, अशी भावना विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सीईटी कक्षाने विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे परीक्षेची संधी देण्याबाबत विचार करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली जात आहे.

'जेईई सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांम ध्ये नावातील किरकोळ विसंगती असतानाही विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची मुभा दिली जाते. मग राज्य सीईटी कक्ष असा कठोर नियम का लावत आहे?' असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. नोंदणीची मुदत संपत आली असताना, प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

# तंत्रज्ञान समाजाच्या भल्यासाठी वापरावे, त्याची गुलामी नको !

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

तंत्रज्ञान ही अपरिहार्य गोष्ट आहे. स्वदेशीचा वापर म्हणजे तंत्रज्ञान नाकारणे असे नाही; परंतु आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होता कामा नये.आपण उद्योग केवळ आपल्या नफ्यासाठी नाही, समाजाच्या भल्यासाठी करतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

**सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रतिपादन**

रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे आरएसएस च्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित जनसभेत भागवत यांनी हे विचार मांडले. ते पुढे म्हणाले, समाजाची गरज पूर्ण करण्यासाठी आपण काम करतो. त्यामधून आपला उदरनिर्वाह होतो. आपल्याकडचा शेतकरी अजूनही शेती करणे हा माझा धर्म आहे असे सांगतो. हा उदात्त विचार अन्य कुठे नाही. त्यामुळे आपले काम समाजाभिमुख आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान आपल्या देशातील परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे. आपल्या तंत्रज्ञानामुळे सम ाजाचे नुकसान होणार नाही, रोजगार कमी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे असे ते म्हणाले.

धर्मच मला आणि नरेंद्र मोदींना चालवत आहे. धर्म संपूर्ण ब्रह्मांडाचा चालक आहे. जेव्हा सृष्टी अस्तित्वात आली, तेव्हा तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणारे नियम धर्म बनले. सर्व काही त्याच सिद्धांतावर चालते. भारताला आपल्या संत आणि ऋषींकडून मार्गदर्शन मिळत आले आहे. जोपर्यंत असा धर्म भारताला चालवेल, तोपर्यंत तो विश्वगुरु राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.संघ हा व्यक्ती निर्माणाचे काम करतो, याशिवाय काहीही करत नाही. संघ प्रतिक्रियेतून तयार झालेले संघटन नाही. संघाची कोणासोबत स्पर्धा देखील नाही. संघाला सर्व समाजाच्या सोबतीने भारताला परम वैभवसंपन्न करायचे आहे. संघाला स्वतः मोठे व्हायचे नाही. संघाला समाजाला मोठे करायचे आहे. संघाला समाजातील संघटन नाही तर, समाजाचे संघटन करायचे आहे. एक वेळ अशी आली पाहिजे की सर्व समाज संघाच्या विचारांनी काम करू लागेल, त्यावेळी संघाची वेगळी ओळख राहणार नाही. हेच संघाला अपेक्षित आहे. त्यामुळे संघ समजून घ्यायचा असेल तर संघाच्या शाखेत आले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

## धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावित होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

१७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मि तेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नाम वंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे म ान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरुंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

**– अलका पाटील**

उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

---

### श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष लेख

# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप - श्री गुरु तेग बहादूर साहिबजी

श्री. गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. जेव्हा एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे. नांदेड येथे होत असलेल्या २४ व २५ जानेवारी २०२६ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.




श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहेत. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.



श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता. इसवी सन १६६४ मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णुता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, म ायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न होण्याची प्रेरणा देते. गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरम धील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले. कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणाम ांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता.

ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धम ांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते. जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन १६७५ मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांच्या अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताची आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेली आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीम ांपलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय. आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला. धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्वलित राहील...

**-डॉ. अमरजीत कौंके**

हे पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक असून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.)

---

# मुंबई महापालिकेत यंदाही महापौरांविना झेंडावंदन

मुंबई : मुंबई महापालिकेच्या निवडणूक संपन्न होवून मतदारांनी महापालिकेत आपले प्रतिनिधी नगरसेवकांच्या रुपात निवडून दिले आहे. मात्र, नगरसेवक निवडले गेले असले तरी महापौरपदासाठी आरक्षण सोडत अद्याप न निघाल्याने महापौरांची निवड काही दिवस लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. परिणामी येत्या २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी मुंबई महापालिकेत होणारे झेंडावंदन हे नवनिर्वाचित महापौरांच्या होणार नाही. हा मान महापौरांचा असला तरी यंदा तरी हा मान महापौरांना मिळणार नसून हे झेंडावंदन यंदाही महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ भूषण गगराणी यांच्या हस्तेच पार पडण्याची शक्यता दाट शक्यता आहे.

मुंबई महापालिका मुख्यालयात २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी आणि १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी महापौरांच्या हस्ते झेंडावंदन केले जाते. परंतु ७ मार्च २०२२पासून नगरसेवकांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे महापालिकेची सुत्रे प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांच्या हाती आली आहेत. त्यामुळे मार्च २०२२पासून प्रशासक नियुक्त महापालिकेत आयुक्तांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी आणि स्वातंत्र्यदिनी झेंडावंदन तथा ध्वजारोहण केले जाते. परंतु यंदाच्या निवडणूका जाहीर होवून १६ जानेवारी रोजी निकाल लागल्याम ुळे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम नवनियुक्त महापौरांच्या हस्ते पार पडेल अशाप्रकारची शक्यता होती. परंतु नगरसेवकांची निवड झाल्यानंतरही महापौर पदाची आरक्षण सोडत जाहीर न झाल्यामुळे महापौर निवडीची प्रक्रिया हाती घेता येत नाही.तसेच येत्या १९ किंवा २० जानेवारी रोजी नगरविकास खात्यामार्फत या महापौर पदाची आरक्षण सोडत काढल्यानंतरही पुढील सात ते आठ दिवसांचा कालावधी अपेक्षित असल्याने २६ जानेवारी पूर्वी महापौरपदाची निवड अशक्यच असल्याची माहिती मिळत आहे.

## प्रभाग क्र. २५ मधील मतदारांचे मनापासून आभार

# मी मतदारांच्या मनातील नगरसेवक; संकटात धावून जाईल– बळीराम कदम

**दिनेश परदेशी छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

नुकताच झालेल्या महानगरपालिका निवडणूकीसंदर्भात सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्याशी चर्चा करण्यासाठी प्रभाग क्र. २५ मधील उमेदवार बळीराम कदम यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मतदारांचा पाठींबा आपल्या चांगल्या प्रकारात मिळाला. परंतु काही घटना अशा घडल्या की त्यामुळे संपूर्ण निकालावर त्याचा परिणाम झाला. यावेळी पालकमंत्र्यांनीही कदम यांना लढत राहा जे होईल ते होईल. खंबीर बना असे सांगितले.

महानगरपालिका निवडणुक २०२६ मध्ये मी बळीराम कदम प्रभाग क्र. २५ च्या मतदारांचा आभारी आहे. त्यांनी जे माझ्यावर प्रेम केले व मला भरभरून मतदान केले ते मी कदापीही विसरणार नाही. मी ज्या पक्षाची २५ वर्षे इमाने इतबारे सेवा केली. त्यांच्या प्रत्येक परिक्षेत पास होत गेलो. लोकसभा असो विधानसभा असो किंवा कोणतीही निवडणूक असो परंतु माझा विचार यावेळी केला नाही. माझ्यावर व माझ्या परिवारावर अन्याय झाला.

मला ज्या पक्षाने (शिवसेनेने) स्वीकारले त्यांचा मी आभारी आहे. खास करून पालकमंत्री संजय शिरसाठ साहेबांचेही आभार मानतो. त्यांच्या विश्वासाला तडा न जावू देता मी काम केले. ५३३८ मते मला मायबाप मतदारांनी केले. दुसऱ्या स्थानावर राहिलो १६१६ मतांनी मला निसटता पराभव स्वीकारावा लागला. मी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा, मतदारांचा व ज्यांनी मला ज्ञात अज्ञात मदत केली त्यांचा मी ऋणी आहे. मी मतदारांच्या मनातील नगरसेवक आहे, असे बळीराम कदम यांनी अट्टल मतच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

सर्वांना माहिती आहेच एक १४ तारखेला रात्री काय झाले ते पैशाचा महापूरच जणू आला होता हातोहात पैसे देवून मते विकत घेण्याचा घाट घालण्यात आला. त्यात काही तरूण पकडलेही गेले. त्यावर बोलून काही उपयोग नाही सर्व यंत्रणा वेठीस धरली आहे या लोकांनी. पुन्हा जनतेत जावून सुख–दुखात सहभागी होवून नव्याने कामाला लागून जनसेवेचा वसा घेवू पुनश्च एकदा मतदारांचे, शिवसैनिकांचे, माता–भगिनींचे मनापासून आभार असेच प्रेम ठेवावे माझा पराभव जरी झाला तरी तुमच्यासाठी माझे घराचे दरवाजे सदैव उघडे आहेत. बिनधास्तपणे तुम्ही माझ्याकडे तुमच्या वॉर्डातील अडचणी सांगितल्या तरी मी वॉर्डातील समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध आहे, असे बळीराम कदम यांनी सांगितले.



### धनशक्ती विरूद्ध जनशक्तीचा पराभव



“निवडणुकीचा निकाल आज समोर आला आहे. तो आपल्या अपेक्षेप्रमाणे नसेलही, पण लोकशाहीत जनतेचा निर्णय अंतिम असतो आणि आम्ही त्याचा मनापासून आदर करतो. गेल्या अनेक दिवसांत दिवस–रात्र मेहनत करणारे आमचे कार्यकर्ते, पाठीशी उभे राहिलेले हितचिंतक आणि आमच्यावर विश्वास ठेवून मतदान करणारे सर्व मतदार–आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. तुमची साथ, तुमचे प्रेम आणि विश्वास हेच आमचे खरे बळ आहे. लक्षात ठेवा, विजय हा शेवट नसतो आणि पराभव हा अंत नसतो. हा एक अनुभव आहे, एक शिकवण आहे आणि पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा देणारा टप्पा आहे. निवडणूक संपली असली तरी माझे तुमच्याशी नाते संपलेले नाही. समाजसेवेचे आमचे ध्येय कायम आहे. मी आणि आमची संपूर्ण टीम पूर्वीप्रमाणेच तुमच्या प्रत्येक सुख–दुःखात, प्रत्येक अडचणीत, तुमच्या सोबत ठामपणे उभी राहू. आज नाही जिंकलो, पण उद्याच्या कामासाठी अधिक मजबूत झालो आहोत. तुमची साथ हीच आमची खरी ताकद आहे आणि ती कायम राहील !

**– बळीराम बाबुराव कदम**

# आभार नाही, ऋणात आहोत, ऋणात राहिल –जालिंदर शेंडगे



जालिंदर शेंडगे 4919 मतांनी विजयी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रभाग क्रमांक २० अ मध्ये भारतीय जनता पार्टीचे जालिंदर शेंडगे यांनी ७३९० मते मिळाली. त्यांनी शिवसेनेच्या राजेंद्र वाहुळे यांचा ४९१९ मतांनी पराभव करत दणदणीत विजय मिळवला विजयाच्या पार्श्वभूमीवर बोलताना जालिंदर शेंडगे म्हणाले की हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा विजय आहे कार्यकर्त्यांनी मित्रमंडळींनी नागरिकांनी संपूर्ण जनतेपर्यंत जाऊन भाजपच्या विकासाचे मुद्दे पोचवली व त्याचा परिणाम मतांमध्ये झाला भारतीय जनता पार्टीचे मंत्री महोदय अतुलजी सावे आमदार संजय भाऊ केणेकर शहराध्यक्ष किशोर शितोळे व सर्व पदाधिकाऱ्यांचा मी आभारी आहे. मला मतदारांनी काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वांचे धन्यवाद मानतो असे नवनिर्वाचित नगरसेवक जालिंदर शेंडगे यांनी सांगितले.



“आपल्या छत्रपती संभाजीनगर नगरसेवकाची दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी निवडणुक पार पडली. १६ जानेवारी निकाल जाहीर झाला. माझ्या गळयात विजयश्री प्राप्त झाली. प्रभाग क्र. २० मधील मतदारांचे मनापासून धन्यवाद मानतो. प्रत्येक कार्यकत्याने घेतलेली मेहनत ऐतिहासिक विजयाची हमी देणारी होती, यात संदेह नाही, निवडणुक जाहीर झाल्यापासून भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करून छत्रपती संभाजीनगर शहरात आलेला विकासकामांचा जागर घराघरापर्यंत पोहचवला. विशेष म्हणजे ही निवडणूक समस्त छत्रपती संभाजीनगरकरांनी आपल्या हाती घेतली होती सर्व मतदार उत्साहाने मतदार प्रक्रियेत सहभागी झाले त्यांचेही मनःपूर्वक धन्यवाद. सर्वांनी अथक परिश्रम केले, प्रचार यंत्रणा प्रामाणिकपणे राबवली. आभाराचे शब्द तोड़के ठरावेत, अशीचं ही एकजुटीची ताकद आहे. यासाठी ऋणात आहोत आणि सदैव ऋणात राहू.

**–जालिंदर शेंडगे नवनिर्वाचित नगरसेवक**

# नांदेडमध्ये साकारणार ५२ एकरांवर 'हिंद-दी-चादर'चा भव्य ऐतिहासिक सोहळा !

## ८ ते १० लाख भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची माहिती

**लातूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड नगरी एका ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार होणार आहे. राज्य शासनाच्या वतीने २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ५२ एकरांच्या विशाल परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येत असल्याची माहिती नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दिली.



**५२ एकरांवर अध्यात्मिक नगरी**

या सोहळ्यासाठी प्रशासनाने ५२ एकर जागेवर भव्य मंडप उभारला आहे. भाविकांच्या सोयीसाठी ८ महालंगर, अत्याधुनिक प्रदर्शन केंद्र, साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स आणि आरोग्य शिबिरे उभारण्यात येत आहेत. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे.

**दिग्गजांची मांदियाळी** – या सोहळ्यास देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री व संत–महात्मे उपस्थित राहणार आहेत.

**सेवाभावी संस्थांना आवाहन** – देशभरातून सुमारे ८ ते १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे. या भाविकांच्या सेवेसाठी ज्या स्वयंसेवी संस्थांना (छत्रजी) सेवा द्यायची आहे किंवा स्टॉल्स लावायचे आहेत, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही कर्डिले यांनी केले आहे. प्रशासनातर्फे त्यांना जागा उपलब्ध करून दिली जाईल. या ऐतिहासिक सोहळ्यात सर्व नांदेडकरांनी आणि भाविकांनी सहकुटुंब सहभागी होऊन या अभूतपूर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# साई मंदिर येथे श्रीमद् भागवत कथा सप्ताह

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री साई घृष्णेश्वर मंदिर प्रथम वर्धापन दिना निमित्त व संत गजानन महाराज प्रकट दिना निमित्त साई मंदिर येथे श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन १ ते ८ फेब्रुवारी दरम्यान श्री साई मंदिर क्षेत्र वेरूळ, गट नं.५४० धुळेरोड, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.

भागवताचार्य वे.शा.सं.ह.भ.प. श्री. नित्यानंद महाराज वासीमकर यांच्या श्रीमुखातून भागवत कथा वाचन होणार आहे. श्री.ह.भ.प.कृष्णाजी महाराज अरागडे किर्तनकार (वार्थी) यांचे कीतर्न होणार आहे. सर्व साई भक्तांनी याचा लाभ घ्यावा ही विनंती आयोजकांनी केली आहे.

कार्यक्रम रूपरेषा – रविवार दिनांक ०१/०२/२०२६ रोजी तिथी माघ पौर्णिमा रोजी सकाळी काकडा आरती, अभिषेक, पुजा त्यानंतर कलस पुजा ६ वा. ध्वजा रोहण नंतर श्रीमदब भागवत कथा ग्रंथ पुजन व्यास पीठ पुजन होईल. त्यांनतर दररोज श्रीमदब भागवत कथा सुरू होईल श्री. नित्यानंद महाराज वासीमकर यांच्या मधुर वाणीतुन दुपारी ०१ ते ०४ आयोजीत केली आहे. त्यानंतर संध्याकाळी ०५ ते ०७ श्री साई भजनी मंडळ यांचा हरिपाठ आयोजित केला.

त्यानंतर दिनांक ०८/०२/२०२६ रोजी रविवार सप्ताह सांगता व गजानन महाराज प्रकट दिनांनिमित्त सकाळी ०७ते ११ श्रीगणेश याग व श्री.स. अतुल गुरू जोशी घोडेगावकर श्री पारोहीत गुरू व पंच ब्राम्हण द्वारे आयोजित केले आहे. त्यानंतर दुपारी १२ ते ०२ काल्याचे किर्तन ह.भ.प. श्रीकृष्णाजी महाराज आरगडे यांचे आयोजीत केले आहे. त्यानंतर ०२ ते ०५ महाप्रसाद श्री. राहुलजी भागवत तर्फे आयोजीत केला आहे. तरि सर्व साई भक्तांनी यांचा लाभ घ्यावा.

आपले विनीत : मंदिर प्रमुख श्री. भास्करराव गीताबाई पंडीतराव रेघे ताजनापुरकर, काकड आरती हरिपाठ सप्ताह भक्त श्री कारभारी दसरथ ठेंगडे, श्री. लक्ष्मणराव बरडे, श्री. उत्तमराव गि. ठेंगडे, श्री. धोंडीराम सा. ठेंगडे, श्री. एकनाथ धोंडीराम ठेंगडे, श्री. त्र्यंबकराव ठेंगडे, श्री. देवगिरी ट्रस्ट, दौलताबाद, भजनी मंडळ ह.भ.प. परमेश्वर महाराज मंडळ.

व्यवस्थापक : श्री. रामेश्वर ठेंगडे, पळसवाडी मो. ९७३०७३५४७७

उत्सव समिती – श्री. सोमनाथ कचरूजी शेलार, छत्रपती संभाजीनगर, श्री. राहुलजी भागवत साहेब, छत्रपती संभाजीनगर, श्री. मकरंदजी शेवलेकर, श्री. पांडूरंग ऑटे, श्री. मच्छींद्र ऑटे, श्री.रामहरि ओटे व समस्त साईभक्त ग्रामस्त, वेरूळ, पळसवाडी, बोरगाव.

# हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० वे शहीदी समागम वर्ष

## जिल्ह्यातील शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद समागम वर्षानिमित्त त्यांचे कार्य व इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात विविध शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यासंदर्भात शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात ४४५९ शाळा आहेत. त्यातील ३९४३ शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व स्पर्धा परीक्षा घेऊन जनजागृती करण्यात आली. २५९७ शाळांमध्ये समुह गीत गायनाचे आयोजन करण्यात आले. २९३० शाळांनी प्रभात फेरी काढून गावात जनजागृती केली. ४१२५ शाळांमध्ये माहितीपट व भक्तीगीताचे व्हिडीओद्वारे प्रदर्शन करण्यात आले. आयोजीत केलेल्या विविध स्पर्धांमधून १३६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नवगाव येथे प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच गुरुतेग बहादुर यांच्या जीवनावर आधारित हिंद दी चादर या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. पिंपळगाव गंगदेव ता. छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळेत मध्ये श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्षा निमित्त विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तिडका ता. सोयगाव येथे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जोगेश्वरी ता. गंगापूर प्रभात फेरी काढून त्यांच्या जीवनावर आधारित गीत विद्यार्थ्यांना ऐकवले. तर टोणगाव येथे गुरूतेग बहाद्दूर प्रभातफेरी व चित्रकला स्पर्धा आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामिण व शहरी भागातील विविध शाळांमध्ये हे उपक्रम राबवून जनजागृती करण्यात आली.

# गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' कार्यक्रमाचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून आढावा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ (विमाका): श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या तयारीचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला दुरदृष्य प्रणालीद्वारे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, माहिती यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त मंजुषा मिसकर, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते. आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती उपक्रम, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा-सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त श्री. पापळकर यांनी केले. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी बैठकीस विभागातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, आरोग्य, शिक्षण यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# प.पु.गणेशलालजी म.सा यांच्या जय जय काराने पदयात्रेस प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**




प.पु.कर्नाटक गजकेशरी गणेशलालजी म.सा यांच्या ६४ व्या पुण्यतिथी निमीत्त परमेष्ठी परीवार तर्फे छत्रपती संभाजीनगर ते जालना पदयात्रा आयोजीत करण्यात आली होती. हि पदयात्रा दिनांक१६ जानेवारी रोजी आयोजीत करण्यात आली होती. हि पदयात्रा सकाळी ६ वाजता महावीर भवन कुंभारवाडा येथुन पदयात्रा प्रारंभ झाली. यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष झुंबरलाल पगारिया, मिठालाल कांकरिया, दिलीप मुगदिया सजय काकरीया पारस तातेड मनसुख चोपडा मागीलाल फुलफगर सजय सचेती प्रफुल श्रीश्रीमळ नि र्मल कोठारी प्रितेश बोरा यांच्यासह परमेष्ठी परीवार सदस्यांनी पंचरंगी जैन ध्वज दाखवुन पदयात्रा प्रारंभ करण्यात आली.प.पू. गणेशलालजी मा.सा. यांचे जालना येथील शिवाजी चौक येथे समाधी स्थळ आहे. अमावस्येच्या दिवशी गुरुमहाराज यांचे समाधी मरण झालेले आहे व त्याठिकाणी त्यांना समाधी देण्यात आली. म्हणून येथील समाधी दर्शनाला अमावस्येच्या दिवशी जैन धर्मात फार महत्व आहे. यावेळी पुरफ्ष व महिलांनी पंचरंगी ध्वज पुढे घेवुन चालत होते. तसेच महिला व पुरूष शिस्तबध्द लाईनेने एका रांगेत चालत होते. पदयात्रेते ३५० भाविकांचा सहभाग होता. हि पदयात्रा औरंगपुरा, कुंभारवाडा मार्गे चिकलठाणा, करमाड, तदनंतर जालना येथे पोहचुन प.पु. गणेशलालजी म.सा यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतील. तसेच तेथे धार्मिक कार्यकम सुध्दा आयोजीत करण्यात आला आहे. पदयात्रेचे संपुर्ण आयोजन परमेष्ठी परीवार तर्फे करण्यात येत छत्रपती संभाजीनगर ते जालना पदयात्रेत १० वर्षापासुन ते ७५ व्या वर्षापर्यतच्या महिला व पुरफ्षांचा सहभाग असतो. पदयात्रेत भाविक प.पु.गणेशलालजी मसा यांचा जय जय कार अहिंसा परमो धर्म की जय, जिओ और जिने दो अशा धार्मिक घोषणा देत होते. पदयात्रेमध्ये भाविकांची भोजनाची व्यवस्था व धार्मिक कार्यकमाची भक्ती संगीत ठेवली आहे तसेच एकासना, आयबिल, उपवास करणाऱ्या भाविकांसाठी पदयात्रा दरम्यान गरम पाण्याची सुविधा देखील करण्यात आलेली आहे.

परमेष्ठी युवती मडळानी प.पु. गणेशलालजी म. सा प्रतिकृति १०८ सदगुरु नाथ जाप चे बॅनर आकषक दिसत होते यशस्वी करण्यासाठी प्रितेश बोरा, संतोष बोरा, पारस कात्रेला, विनोद कुंकूलोळ, पंकज संचेती, हितेंद्र चोरडिया, संदिप सुराणा, जितेंद्र चोरडिया, संतोष खिवंसरा, प्रकाश बांठिया, सत्यजीत सुराणा, प्रदिप बेदमुथा, रुपेश डोसी, संदीप काठेड, प्रविण भंडारी, प्रविण डोसी, रुपेश बोथरा, संतोष मुगदिया, जितेंद्र रेदासणी, रमेश बंब, राजेश बोरा व परमेष्ठी युवा ग्रुप यांनी परीश्रम केले

# माहिती आयोगात दाखल प्रकरणांचा गतीने निपटारा छत्रपती संभाजीनगर खंडपीठाची उल्लेखनीय कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यात उल्लेखनीय यश मिळवले आहे. सन २०२४ मध्ये खंडपीठाने १४ हजार १ द्वितीय अपिले निकाली काढली असून, २०२५ मध्ये १० हजार ७८३ द्वितीय अपिलांचा यशस्वी निपटारा करण्यात आला आहे.

आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या निपटाऱ्याच्या प्रमाणात जवळपास दहापटीने वाढ झाली असून, द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेत सुमारे ५५ टक्क्यांची लक्षणीय घट झाली आहे. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या प्रभावी प्रशासकीय नियोजनामुळे आणि सातत्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. तक्रार निवारणात २०२५ मध्ये १० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. २०२४ अखेरीस प्रलंबित असलेल्या १६५ तक्रारींची संख्या डिसेंबर २०२५ अखेर ८५ वर आली असून, त्यामुळे प्रलंबित तक्रारींमध्ये ५१ टक्के घट झाली आहे.

द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेतही मोठी घट झाली आहे. २०२४ अखेरीस ८ हजार ६९९ द्वितीय अपिले प्रलंबित होती. ती संख्या डिसेंबर २०२५ अखेर ३ हजार ९४६ इतकी झाली असून, प्रलंबित अपिलांच्या प्रमाणात सुमारे ५५ टक्के घट झाल्याचे स्पष्ट होते. राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाची ही कामगिरी माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस बळ देणारी ठरली आहे.

राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठामार्फत प्रकरणांचा जलद व पारदर्शक निपटारा करण्यावर भर देण्यात आला आहे. नियोजनबद्ध कामकाज, सुनावणीतील शिस्त आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे प्रलंबित अपिले व तक्रारींच्या निपटाऱ्यात लक्षणीय प्रगती साधता आली आहे.नागरिकांना माहिती अधिकार कायद्यांतर्गत वेळेत न्याय मिळावा, हाच आयोगाचा मुख्य उद्देश आहे. भविष्यातही प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील तसेच माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी अधिक मजबूत करण्यात येईल.

# मणिकर्णिका घाटावर बुलडोजर

**वाराणसी :** वाराणसीतील मणिकर्णिका घाटावर सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी काही ठिकाणी पाडकाम करण्यात आले असून, त्यावरून राजकारण तापले आहे. गेल्या दोन दिवसांपासून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. सोशल मीडियावर व्हिडीओ, फोटो व्हायरल होत आहेत. यातील काही फोटो कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केले गेले असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. हेच फोटो व्हायरल करून समाजात भ्रम निर्माण केला जात असल्याचे सांगत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाराणसी पोलिसांनी मणिकर्णिका घाटावर सुरू असलेल्या पुनर्विकासाच्या कामाबद्दल सोशल मीडियावर एआय फोटो, व्हिडीओ आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवल्याप्रकरणी आपचे खासदार संजय सिंह आणि कॉंग्रेसचे खासदार पप्पू यादव यांच्यासह ८ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आठ लोकांविरोधात पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199